**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ०५/२०१६-१७/७८ दिनांक:०८-०७-२०१६

**आदेश**
**आदेश केस क्र. ०५/२०१६-२०१७**

| | |
|---|---|
| श्रीमती गुरुबाई शिवशंकर बिराजदार,<br>मु. पो. विठ्ठलवाडी उमदी,<br>ता. तासगांव, जिल्हा सांगली. | **अर्जदार** |

**विरूध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, सांगली<br><br>२) कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठेमहांकाळ<br><br>३) उपकार्यकारी अभियंता / अति. कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभागीय कार्यालय, संख सांगली | **पक्षकार** |

**कोरमः-** १. श्री. पी.व्ही.खपली, सदस्य सचिव,
२. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

मी श्री. पी.व्ही.खपली, सदस्य सचिव ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर परिमंडळ खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहे.

आज दिनांक २५-०५-२०१६ रोजी केस क्रमांक ५/२०१६-१७ श्रीमती गुरुबाई शिवशंकर बिराजदार , मु.पो. विठ्ठलवाडी उमदी ता. जत. जि. सांगली यांची ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर येथे सुनावणी घेण्यात आली. यासाठी श्री एस. एस. दराडे, कार्यकारी अभियंता कवठेमहाकांळ, श्री एम. आर. शेंडे, उप कार्यकारी अभियंता संख कार्यालय हे उपस्थित होते. ग्राहकातर्फे प्रतिनिधी म्हणून श्री एच. डी. खापरे , हे उपस्थित होते.

## ग्राहकांचे म्हणणे व तक्रारीचे स्वरुप

श्रीमती गुरुबाई शिवशंकर बिराजदार, मु.पो. विठ्ठलवाडी उमदी ता. जत जि. सांगली यांनी मंचाकडे परिशिष्ट'अ' मध्ये केलेला अर्ज दि. १६-०४-२०१६ रोजी प्राप्त झाला आहे. यापूर्वी त्यांनी अंतर्गत निवारण कक्ष सांगली येथे आपणांस शेती पंपासाठी विज जोडणी मिळावी, म्हणून 'क्ष' फॅार्म मध्ये अर्ज दाखल केला होता. त्यांचे उत्तरात जेष्ठता यादीप्रमाणे आपणास विद्युत पुरवठा केला जाईल. अशा त-हेचा आदेश देण्यात आला होता. सबब तो आदेश मान्य नसल्यामुळे त्यांनी मंचाकडे अर्ज दाखल केला आहे.

ग्राहक बिराजदार यांनी आपल्या गट क्र.३४/२ मध्ये ५ अश्वशक्ती शेती पंपासाठी पावती क्रमांक १०४६९४३ दिनांक ०८-१२-२०१४ रोजी रु. ६,१००/- भरलेले आहेत. परतु अद्यापही त्यांना विज पुरवठा मिळालेला नाही. त्यांनी आपल्या अर्जामध्ये जेष्ठता यादी ही संकल्पना कायदेशीर नाही. कृती मानके विनिमया अंतर्गत विज जोडणी देणे हे महावितरणला बंधनकारक आहे, आणि नियमातील तरतूदीनुसार जर विज जोडणी दिली नसेल तर ग्राहकांस विलंब भरपाई मिळावयास पाहिजे. तरी मला त्वरीत विज जोडणी देण्यात यावी. आणि विलंबा बाबत भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे.

## विरोधी पक्षाचे निवेदन आणि चर्चा

वि.प. महावितरणने ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर यांचेकडे उपविभाग संख मार्फत कार्यकारी अभियंता कवठेमहाकाळ यांना दिनांक ३०-०४-२०१६ रोजी पाठविलेल्या पत्राची प्रत पाठविली आहे. सदर पत्राची प्रत ग्राहकांनाही पाठविली आहे. प्रत्यक्ष चर्चे दरम्यान कार्यकारी अभियंता, कवठेमहाकाळ यांनी आमच्याकडे प्रलंबित यादी खूप मोठी आहे. विज जोडणी देण्यासाठी निधीची आवश्यकता आहे. सध्या काही रक्कम आमच्याकडे वर्ग होईल. त्यातून आम्ही जास्ती जास्त लोकांना प्रतिक्षायादी जेष्ठतेनुसार विज जोडणी देणार आहोत असे सांगितले. श्रीमती बिराजदार यांचा नंबर जेष्ठता यादीमध्ये ३७१ असा आहे. तरी आम्ही त्यांना यादीनुसार विज जोडणी देण्याची व्यवस्था करु नये असे सांगितले . यावर ग्राहक प्रतिनिधीनी आम्हांस विनिमयातील तरतूदी व कृति मानके यानुसार विज जोडणी मिळणे आवश्यक आहे असे सांगितले. त्यावर जेष्ठता यादी डावलून जर मध्येच कनेक्शन दिले तर इतरावरअन्याय होईल. असे कथन केले. SOP ची विलंब भरपाईची मागणी कोणाकडे करावयाची असे ग्राहक प्रतिनिधी यांनी विचारता आम्ही ते मार्गदर्शन घेऊ असेही महावितरण तर्फे सांगण्यात आले,वरील चर्चा लक्षांत घेता खालील मुद्दे उपस्थित होतात.

१) ग्राहकांची मागणी मान्य करता येईल काय?

उत्तरः- होय, नियमाप्रमाणे

२) विलंब भरपाईची मागणी मान्य करता येईल काय?

उत्तरः- होय, नियमाप्रमाणे

## कारणमिमांसा

१) ग्राहकांने दि. ०८-१२-२०१४ रोजी शेती पंपासाठी विज जोडणी मिळावी म्हणून अर्ज केला आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग (वितरण परवाना कृतीची मानके विद्युत पुरवठा करावयाचा कालावधी व भरपाईचे निश्चितीकरण) विनिरयम २०१४ च्या नियम क्र ४.८ नुसार ग्राहकांस विद्युत पुरवठा करण्यात यावा. असे हा मंच सूचित करित आहे. तरी विज जोडणी Standerd Method of Construction या प्रमाणे देण्यात यावी. अशी विज जोडणी मिळणेस ग्राहक पात्र आहे, म्हणून मुद्दा क्रमांक १ चे उत्तर होय असे आहे.

२) ग्राहकांने आपणांस विद्युत पुरवठा मिळण्यास झालेल्या विलंबाबाबत नियमानुसार विलंब भरपाई मागितली आहे. ही गोष्ट कायद्यास धरुन आहे. म्हणून ह ग्राहक नियमाप्रमाणे भरपाई मिळण्यास पात्र आहे. म्हणून मुद्दा क्रमांक २ चे उत्तर होय, नियमाप्रमाणे असे आहे. ग्राहकांने मागणी केल्या प्रमाणे विलंब भरपाईचा अर्ज कोणाकडे करावा. यांचे ग्राहकांस मार्गदर्शन व्हावे.

## आदेश

१. अर्जदारास त्वरीत विज जोडणी देण्यात यावी.
२. नियमानुसार ग्राहकास विलंब भरपाईबाबत अवगत करावे
३. सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.
४. या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

(पी.व्ही. खपली)
सदस्य सचिव

अध्यक्ष पद दिनांक १६-१२-२०१४ पासून रिक्त.

श्री. पी. एस. बुरांडे,
ग्राहक सदस्य

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.